## रे.दि.मु.७०८/२०२० मधील नि.९९ खालील आदेश

(CNR No.MHSN150061592020)

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.४ यांचे वारस अभिलेखावर घेणेकरिता दाखल केलेला आहे. अर्जदाराचे असे कथन आहे की, वादी क्र.४ जोतीराम विठोबा पाटील हे दिनांक ०२.०८.२०२० रोजी मयत झालेले आहेत व वादी क्र.४ ची पत्नी इंदुमती जोतीराम पाटील या दिनांक ०९/०८/२०२० रोजी मयत झालेली आहे. अर्जदार या सदर वादी क्र.४ यांच्या कायदेशिर वारस असून त्यांना प्रस्तुतचे काम पुढे चालविणेचा व जाबदार विरुध्द दाद मागणेचा पुर्ण अधिकार असलेने वादी क्र.४ यांचे वारस अभिलेखावर घेणेची विनंती अर्जदार यांनी नि.९९ ला असलेले अर्जाने केलेली आहे.

(२) प्रतिवादींतर्फे त्याच अर्जावर म्हणणे सादर करुन वादींची सर्व कथने नाकारली आहेत. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे अर्जदाराने वारसाबाबत योग्य ती वंशावळ व पुरावा दाखल केलेला नसलेने अर्ज नामंजूर करणेची विनंती केलेली आहे.

(३) नि.९९ कडील अर्ज, त्यावरील म्हणणे व त्या पृष्ठयर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादी क्र.४ हे दि.०२.०८.२०२० रोजी मयत झाले असून निशाणी क्र.१०५ ला मृत्यू प्रमाणपत्र दिले आहे. तसेच त्यांची पत्नी दि.०९/०८/२०२० रोजी मयत झाली असून तिचा मृत्यू दाखला नि.१०५ ला आहे. अर्जात उल्लेख केल्याप्रमाणे वारस हे प्रस्तुत दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार झालेले आहेत. अर्जदाराने नि.९९ कडील अर्जात कलम २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सुजाता प्रताप माने या वादी क्र.४ यांच्या वारस नाहीत असा आक्षेप प्रतिवादींनी घेतलेला नाही. प्रतिवादींनी केवळ वंशावळी व पुरावे सादर केलेले नाही असे म्हटले आहे. अर्जदाराने मुदतीत प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

त्यामुळे, दावा चालविण्याचा अधिकार त्यांना असलेमुळे तसेच फलित व परिणामकारक हुकूमनामा होणेकरिता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

(१) नि.९९ कडील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

(२) अर्जदाराने अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती या अर्जाचे आदेशापासून पुढील तारखेपर्यंत करावी व दुरुस्त अर्जाची प्रत हजर करावी.

(३) सदर दुरुस्तीची नोंद संगणक प्रणालीमध्ये तसेच अर्जाचे नोंद रजिस्टरमध्ये घेणेत यावी.

Deepali Shivaji Chothe

Digitally signed by Deepali Shivaji Chothe
Date: 2021.02.12 16:57:44 +0530

विटा.
दिनांकः-११.०२.२०२१

( दीपाली शि. चोथे )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा,
जि. सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Swarup V. Gaikwad |
| Name of the Court | :- | Smt. Deepali S. Chothe,<br>Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 11.02.2021 |
| Order signed by P.O. on | :- | 12.02.2021 |
| Order uploaded on | :- | 12.02.2021 |